दिनांक ०७/०६/२०२२

प्रसिध्दी पत्रक

**आ.लो.से. श्री. भाऊसाहेब मुरलीधर जमधडे, वय 57 वर्षे, पोलीस उप निरीक्षक, नेमणुक-आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद ग्रामीण. रा. भक्तीनगर, प्लॉटनं.130 पिसादेवीरोड औरंगाबाद. यांनी तक्रारदार यांच्याकडुन रु.3000/- लाचेची रक्कम स्विकृती केल्याने, ते लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे बिडकीन,औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. भाऊसाहेब मुरलीधर जमधडे, वय 57 वर्षे, पोलीस उप निरीक्षक, नेमणुक-आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद ग्रामीण. रा. भक्तीनगर, प्लॉटनं.130 पिसादेवीरोड औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 5,000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 3,000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. नंदकिशोर क्षीरसागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या विरुध्द पो.स्टे. बिडकीन औरंगाबाद ग्रामीण येथे दाखल असलेल्या गुन्हयात सहकार्य करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार व इतर 71 शेतकऱ्याविरुध्द पोलीस ठाणे बिडकीन औरंगाबाद ग्रामीण येथे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बिडकीन यांनी पीक कर्जाचे वाटपा संदर्भात झालेल्या फसवणुक वरुन पो.स्टे. बिडकीन औरंगाबाद ग्रामीण येथे गु.र.नं.12/2021 कलम 420,67,68 भादंवि. प्रमाणे दाखल आहे. सदरचा गुन्हा तपासकामी आर्थिक गुन्हे शाखा, औरंगाबाद ग्रामीण यांचेकडे वर्ग झालेला असून सदरचा तपास आ.लो.से.श्री.जमधडे यांचेकडे आहे. सदर गुन्हयात तक्रारदार यांना आरोपी न करण्यासाठी यापुर्वी 30000/-रु.ची मागणी केली होती त्यापैकी 25000/-रु यापुर्वीच मध्यस्तामार्फत स्विकारलेले आहेत. परत तक्रारदार यांना सदर गुन्हयात दि. 18/5/22 रोजी अटक करुन जामीना करिता प्रक्रिया केली या कारणास्तव तक्रारदार यांच्याकडे एका दिवसात जामीन मिळवून दिला म्हणून बाकी राहिलेले 5000/-रु.चा आरोपी लोकसेवक यांनी लाचेची मागणी करीत असलेबाबत तक्रारदार यांनी दि. 02 /06/2022 रोजी समक्ष तक्रार दिली.<br><br>सदर तक्रारीचे अनुषंगाने लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, आ.लो.से. श्री. जमधडे यांनी उर्वरीत 5,000/- रुपयाची मागणी करुन तडजोडी अंती 3000/-रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br><br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे दि. 07/06/22 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. श्री.जमधडे यांनी पंच साक्षीदारासमक्ष तडजोडीअंती टरलेली लाचेची रक्कम 3000/- रुपये पो.स्टे. बिडकीन येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह आ.लो.से.जमधडे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.स्टे. बिडकीन औरंगाबाद ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. रुपचंद वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री. नंदकिशोर क्षीरसागर यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं/राजेंद्र जोशी, रविंद्र काळे, सोमीनाथ थिटे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अग लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com. 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाइन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 8888807299 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994

पोलीस उप अधीक्षक :- 9356115189

(रुपचंद वाघमारे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबा